दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १०७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.२९ नोव्हेंबर २०२४

**सुविचार**

निघून गेलेला क्षण कधीच परत येत नाही, जे होऊन गेले त्याचा विचार करू नका, पुढे काय करू शकता याचा विचार करा...

## संत ज्ञानेश्वर माऊलींचा ७२८ वा समाधी सोहळा लाखो वारकऱ्यांच्या साक्षीने संपन्न



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, आळंदी :** संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा ७२८ वा संजीवन समाधी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात पार पडला. तीन दिवसांपासून अलंकापुरी आळंदीत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले आहेत. ग्यानबा तुकाराम, ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम या जयघोषाने आणि टाळ मृदंगाच्या गजरात अवघी आळंदी दुमदुमून गेली. मुख्य मंदिरावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. सकाळी माऊलींच्या समाधीवर दुग्धआरती व अभिषेक करण्यात आला. संत नामदेव महाराजांच्या हस्ते किर्तन सेवा देण्यात आली. यावेळी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधी मंदिरावर फुलांची सजावट करण्यात आली होती. योगी, तपस्वी, समाधिस्त माऊली या ओळी नुसार माऊलींचा ७२८ वा संजीवन समाधी सोहळा लाखो वारकऱ्यांच्या साक्षीने संपन्न झाला. अलंकापुरी आळंदीत उपस्थित वारकरी हळवे झाल्याचे पाहायला मिळाले. फुलांची उधळण करत माऊलींना निरोप देण्यात आला. सकाळी नऊ ते बाराच्या दरम्यान ह.भ.प नामदेव महाराजांचे संजीवन समाधी सोहळ्याचे कीर्तन झाले. मग, घंटानाद, पुष्पवृष्टी आणि आरती करण्यात आली. या सोहळ्यासाठी आलेल्या शेतकरी वारकऱ्यांनी महायुतीकडून अनेक अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतमालाला योग्य भाव मिळावा अशी मागणी वारकऱ्यांनी सरकारकडे केली आहे.

## हेल्मेटसक्तीचा आता नवा नियम कोणावर होणार कारवाई?



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, पुणे :** हेल्मेटसक्तीची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आल्याने; तसेच अपघाताचे प्रमाण वाढल्याने पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्ह्यात हेल्मेटसक्तीची कडक अंमलबजावणी केली जाणार आहे. राज्याच्या वाहतूक विभागाच्या अपर पोलीस महासंचालकांनी याबाबतचा आदेश पोलीस आयुक्तांना दिला असल्याने चालकाबरोबरच आता दुचाकीवरील सहप्रवाशालाही हेल्मेट परिधान करावे लागणार आहे.

हेल्मेटसक्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

अपघातांमध्ये मृत्युमुखी आणि जखमींच्या संख्येतही वाढ होत असल्याने राज्याच्या वाहतूक विभागाचे अपर पोलीस महासंचालक साळवे यांनी हेल्मेटसक्तीची अंमलबजावणी करण्याबाबतचे पत्र पोलीस आयुक्तांना दिले आहे. त्यानुसार आता हेल्मेटसक्तीची कडक अंमलबजावणी होणार आहे. अपघातांमध्ये होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ते सुरक्षा समितीने दिलेल्या सूचनांची कडक अंमलबजवाणी करण्याचे निर्देशही या पत्राद्वारे देण्यात आले आहेत.

**दंडात्मक कारवाईचे वेगळे चलन**

दुचाकीस्वार आणि सहप्रवासी या दोघांनी हेल्मेट घातले नसल्यास ई चलनाद्वारे दंडात्मक कारवाई करावी. मोटार वाहन कायद्यानुसार विनाहेल्मेट दुचाकीस्वार आणि विनाहेल्मेट सहप्रवासी अशी वेगवेगळी दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचनाही साळवे यांनी वाहतूक विभागाला दिल्या आहेत.

**सरकारी कार्यालयांमध्ये विनाहेल्मेट आल्यास दंड**

पुणे, पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्यात १ डिसेंबरपासून शासकीय कार्यालयात विनाहेल्मेट प्रवेश करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषद, महाविद्यालये, तसेच शासकीय यंत्रणांच्या कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना दुचाकी वापरताना हेल्मेट वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनांचे पालन केले नाही, तर दंडात्मक कारवाई करावी.

**– डॉ. सुहास दिवसे, जिल्हाधिकारी**

मोटर वाहन कायद्यानुसार दुचाकीचालक आणि सहप्रवासी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश आहेत. मात्र, आतापर्यंत केवळ चालकावरच दंडात्मक कारवाई करण्यात येत होती. यापुढे हेल्मेट परिधान न करणाऱ्या सहप्रवाशांवरही दंडात्मक कारवाई होणार आहे. दुचाकीचालक आणि सहप्रवासी यांचे वेगवेगळे दंडात्मक चलन असणार आहे.

**– अमोल झेंडे, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा**

## विरोधाला विरोध करू नका, विकासासाठी एक व्हा : आ. काशिनाथ दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** निघोज ग्रामस्थांच्या वतीने पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघातील लोकप्रिय आमदार काशिनाथ दाते सर यांचा भव्य सत्कार समारंभ व मतदारांचे आभार आयोजन कार्यक्रम प्रसंगी आमदार काशिनाथ दाते सर बोलत होते.

जिल्हा बँक संचालक प्रशांत गायकवाड, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, प्रभाकर शेठ कवाद, सचिन पाटील वराळ, सागर मैड, पंकज कारखिले, विक्रम कळमकर, राजाराम एरंडे, सुधामती कवाद, भास्कर उचाळे, सरपंच चित्राताई वराळ, मनोज मुंगशे प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. दाते म्हणाले कोणत्याही क्षेत्रात अहंकार हा चालत नाही, लोकशाहीमध्ये अहंकार करणाऱ्याची जनता वाट लावल्याशिवाय राहत नाही. जनता डोक्यावरही घेते आणि जमिनीवरही आणते.

बारा झिरो करण्याची भाषा करणाऱ्यांना लोकांनी जमिनीवर आणले. महाभारत घडले ते फक्त अहंकारामुळे, त्यामुळे सत्तेची मस्ती कोणीही करू नये, मी फक्त विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवली. निघोज मध्ये विकासाची सर्व कामे करून देईन हा अजित दादाचा वाद आहे तो पक्का असतो तो पूर्ण केल्याशिवाय राहणार नाही. निघोजकरांनो विचार बदला विरोधाला विरोध करू नका तुमचा विकास करून घ्या विकासाच्या मुद्द्यावर एक व्हा मी या तालुक्याचे विकासाचे व्हिजन घेऊन काम करणार आहे. माझी जनता आणि माझे मतदारसंघात करावयाचा विकास हेच माझं ध्येय असणार आहे. तुम्ही माझ्यावर जो विश्वास टाकला आहे त्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही. आपणाला शांततेने राजकारण करायचे आहे तुम्ही माझ्यावर जो विश्वास टाकला, आमच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला, आमच्या लाडक्या बहिणीने जो विश्वास टाकला त्यांच कौतुक करावं तेवढं कमीच आहे, माझ्या बहिणी कुठल्याही आमिषाला बळी पडल्या नाहीत. उद्याच्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत महायुतीला असंच यश द्या असे आवाहनही आमदार दाते यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद ठुबे यांनी केले.

दाते सर गेले ४० वर्षापासून तालुक्यात काम करतात. निघोजकरांनो आदरणीय दादा व विखे साहेबांच्या माध्यमातून येणाऱ्या सर्व योजनांचा लाभ आमदार दाते सर दिल्याशिवाय राहणार नाहीत. पारनेर, निघोजकरांनी अजित दादांना एक आमदार दिला, आदरणीय दादा मळगंगेच्या आशीर्वादाने राज्याचे मुख्यमंत्री व्हावे, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना दादांनी आणली व पंधराशे रुपये देण्याचा वादा माझ्या लाडक्या बहिणींचा पूर्ण केला. त्या बहिणींनी भावाला आशीर्वाद दिला, दादांनी व महायुती शासनाने बहिणींना लवकरच शासन आल्यावर एकवीशे रुपये देण्याचा वादा तो पूर्ण होणार आहे. **-प्रशांत गायकवाड, संचालक, जिल्हा बँक**

## समीर भुजबळ यांचे राष्ट्रवादीत पुनर्वसनाचे संकेत



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, नाशिक :** नांदगाव विधानसभा मतदारसंघात बंडखोरी करणारे राष्ट्रवादीचे (अजित पवार) माजी पदाधिकारी समीर भुजबळ हे पराभूत झाल्यानंतर पुन्हा या पक्षाचे ज्येष्ठ नेते, काका छगन भुजबळ यांच्याबरोबर सक्रिय झाले आहेत. समीर हे सोबत होते, आहेत आणि राहतील, अशा शब्दांत काकांनी पुतण्याची पाठराखण केल्यामुळे राष्ट्रवादीत (अजित पवार) नव्याने त्यांचे पुनर्वसन होण्याचे संकेत मिळत आहेत.

स्थानिक राजकारणात शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) आमदार सुहास कांदे आणि छगन भुजबळ यांच्यातील वाद सर्वश्रुत आहेत. विधानसभा निवडणुकीत समीर भुजबळ हे मैदानात उतरल्याने उभयतांमध्ये पराकोटीचे मतभेद झाले होते. नांदगावमधील बंडखोरीचे पडसाद नांदगावच नव्हे तर, जिल्ह्यातील अन्य मतदारसंघात उमटले. राष्ट्रवादीच्या (अजित पवार) मुंबई शहराध्यक्षपदाचा राजीनामा देऊन समीर भुजबळ यांनी नांदगावमधून अपक्ष उमेदवारी केली होती. तेव्हापासून छगन भुजबळ यांनी काहिसे अलिप्त धोरण स्वीकारत त्यांचे निवडणूक लढवणे ही बंडखोरी नसल्याचे दर्शविण्याचा प्रयत्न केला. पक्षाचा राजीनामा देऊन ते निवडणूक लढत असून शिंदे गटाने देवळालीत अधिकृत उमेदवार दिल्याकडे काकांनी लक्ष वेधले होते. नांदगावमधील या उमेदवारीने कांदे-भुजबळ वाद पुन्हा उफाळून आला. परस्परांवर आरोप-प्रत्यारोप झाले. हे वाद प्रचारासह मतदानाच्या दिवशी समर्थकांना धक्काबुक्की, धमक्यांपर्यंत गेले होते. निवडणुकीत कांदे यांनी भुजबळ यांना पराभूत करुन काका-पुतण्याला एकाचवेळी शह दिला. विधानसभा निवडणुकीआधी छगन भुजबळ यांनी पुत्र पंकज यांची विधान परिषदेवर वर्णी लावली होती. पराभूत झालेले पुतणे समीर भुजबळ यांचे पुनर्वसन आता कुठे, कसे करणार, याविषयी तर्कवितर्क लढविले जात आहेत. गुरुवारी महात्मा जोतीराव फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त मुंबई नाका येथे फुले स्मारकात छगन भुजबळ यांनी अभिवादन केले. यावेळी आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ उपस्थित होते. या संदर्भात उपस्थित झालेल्या प्रश्नावर छगन भुजबळ यांनी समीर हे बरोबर होते, आहेत आणि उद्याही राहतील, अशा मोजक्याच शब्दांत काय ते सांगून टाकले.

## पडत्या विद्युत खांबाला झाडाचा आधार! दुर्घटना घडल्यावर प्रशासन जागे होणार काय?



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२८, गुहागर :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी गुहागर यांचा ढिसाळ कारभार वारंवार समोर येत असून, गुहागर तालुक्यातील जानवळे येथील चर्मकार वाडी येथे रस्त्यालगत असलेल्या जीर्ण विद्युत खांब झाडाचा आधार घेत असल्याची घटना समोर आली आहे. विद्युत खांबाजवळ मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती घरे आहेत.

सदर विद्युत खांब जीर्ण झाला असून कोणत्याही क्षणी पडून इथे मोठी जीवितहानी होण्याचा धोका संभवतो. या रस्त्यावरून शाळेतील विद्यार्थी ये जा करत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला याठिकाणी मोठा धोका निर्माण संभवतो. मात्र महावितरण कंपनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष तर करत नाही ना? सदर ठिकाणी दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण ? असे प्रश्न याठिकाणी उभे राहिले आहेत. त्यामुळे महावितरण कंपनीच्या संबंधित अधिकारी यांनी त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे. सदर विद्युत खांब त्वरित बदलण्यात यावा अशी आग्रही मागणी मनसेचे उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर यांनी केली आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट जाहीर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, मुंबई :** गेल्या महिन्याभरापासून राज्य परिवहन (एसटी) महामंडळाचे कर्मचारी दिवाळी भेटीची वाट पाहत होते. अखेर गुरुवारी एसटी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात दिवाळी भेट जमा झाल्याने त्यांना दिलासा मिळाला. एसटी कर्मचाऱ्यांना यंदा विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे दिवाळी भेट मिळाली नाही. बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी झाल्यानंतरही बोनस मिळाला नव्हता. आचारसंहिता असल्यामुळे निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन दिवाळी भेट वितरित केली जाईल, असे स्पष्ट करीत बेस्ट उपक्रमाने निवडणूक आयोगाला विनंती पत्र पाठविले होते. त्याच धर्तीवर एसटी महामंडळाने निवडणूक आयोगाला विनंती पत्र पाठवले. एकीकडे बेस्ट उपक्रमाच्या बोनसचा तिढा सुटला. तर, दुसरीकडे एसटी महामंडळातील ९० हजार कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये दिवाळी भेट देण्यात आली.

गेल्यावर्षी एसटीच्या सर्व कर्मचाऱ्यांना सरसकट दिवाळी भेट म्हणून सहा हजार रुपये रोख दिले होते. परंतु, यंदा विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी ६ हजार रुपयांची रक्कम देण्यासाठी एसटी महामंडळाला ५२ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात यावा, असा प्रस्ताव सरकाकडे पाठवण्यात आला होता. मात्र त्यावर त्वरित कार्यवाही केली असती, तर एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी आनंदात साजरी करता आली असती, असे मत महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी व्यक्त केले.

## संपादकीय

### क्रांतिसूर्य...

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची आज (२८ नोव्हेंबर १८९०) पुण्यतिथी! सत्यशोधक समाज संस्थेद्वारे त्यांनी समाजसुधारण्याचे व स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम केले.पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने समाजातील स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी धडपडणाऱ्या ज्योतिबांना आज सर्वांनी त्यांच्या स्मृतीस अभिवादन करूया.

ज्योतिबांनी शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यावर काम केले.महात्मा ज्योतिबा फुले हे उच्च कोटीचे मानवतावादी समाजसुधारक होते. संपूर्ण आयुष्यभर त्यांनी केवळ मानवाच्या हिताचा विचार केला.जीवनात सत्याचा मूलमंत्र काया - वाचा मने जपणाऱ्या ज्योतिबांचा जन्म ११ एप्रिल १८२७ साली माळी समाजातील गोऱ्हे यांच्या घरात झाला.जनतेने त्यांना 'महात्मा' ही उपाधी १८८८ मध्ये बहाल केली.बहुजन समाजाचे अज्ञान,दारिद्रय आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला.त्यांनी १८४८ मध्ये पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपविली.महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाची ही मुहूर्तमेढ ठरली.तसेच अस्पृश्य मुलांसाठी त्यांनी पुण्याच्या वेताळ पेठेत १८५२ मध्ये शाळा स्थापन केली.त्यांच्या या कार्याला सनातन्यांकडून सतत विरोध होत असे.पण ज्योतीबा आपल्या भूमिकेवर ठाम असत. ज्योतिबांनी पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षणकार्यास प्रवृत्त केले.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई.त्याचप्रमाणे स्वतंत्रपणे फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते.ज्योतिबा यांनी ब्राह्मण-पुरोहित यांच्या मदतीविना विवाह-संस्कार आरंभ करवले आणि मुंबई हायकोर्टाकडून मान्यता मिळवली. ते बाल-विवाह विरोधी आणि विधवा-विवाहाचे समर्थक होते.त्यांनी दलितांच्या प्रगतीसाठी अनेक कार्य केले.दलित मुलांचे घरात पालन-पोषण केले.परिणामस्वरूप ते जातीतून बहिष्कृत केले गेले.ज्योतिबा फुले आणि त्यांचं संघटन सत्यशोधक समाजाच्या संघर्षामुळे सरकाराने एग्रीकल्चर एक्ट पास केले.'शेतकऱ्यांचे आसूड' हा महात्मा फुले यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय.तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा,तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया महात्मा फुले यांच्या साहित्यातून उमटलेली होती.त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले.समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे.त्यांनी आपल्या हयातीत गुलामगिरी,तृतीय रत्न,छत्रपती शिवाजी,राजा भोसला का पखडा,किसान का कोडा,अस्पृश्य की कैफियत अशी अनेक पुस्तकेही लिहिली.महात्मा ज्योतिबा आणि त्यांच्या संघटनेच्या संघर्षामुळे सरकारने 'कृषी कायदा' मंजूर केला.धर्म,समाज आणि परंपरा यांचे सत्य समोर आणण्यासाठी त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली.१८८३ मध्ये स्त्रियांना शिक्षण देण्याच्या महान कार्यासाठी त्यांना तत्कालीन ब्रिटिश भारतीय सरकारने स्त्री शिक्षणाचे जनक म्हणून गौरवले.२८ नोव्हेंबर १८९० रोजी वयाच्या ६३ व्या वर्षी पुणे येथे त्यांचे निधन झाले.

समस्त बहुजन समाजाच्या कल्याणासाठी शिक्षणाची दारे खुली करणारे,ऋषितुल्य व्यक्तिमत्व,क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे जीवनकार्य आमच्यासाठी पिढ्यानपिढ्या आदर्श राहील.महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.!

# सिंगल युज प्लास्टिकचा मोठा धोका

एकदा वापरून फेकून देण्याजोग्या (सिंगल युज) प्लास्टिकचा वापर सर्रास होताना दिसत आहे. सिंगल युज प्लास्टिक मध्ये प्लास्टिकचे कप, पिशव्या, पॉलिथिन, स्ट्रॉ, पाण्याची बाटली, प्लेट, अन्न पदार्थ ठेवण्यासाठी झाकण्यासाठी वापरण्यात येणारे पॅकिंग कागद, प्लास्टिकचे ग्लास, पत्रावळ्या यांचा समावेश होतो. सहज उपलब्ध होत असल्याने जो तो सिंगल युज प्लास्टिकचा वापर करतो. सहज आणि कमी पैशात उपलब्ध होत असल्याने सिंगल युज प्लास्टिकचा वापर वाढला आहे. आपल्या देशात दरवर्षी लाखो टन सिंगल युज प्लास्टिकचा वापर केला जातो. भविष्यात हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

सिंगल युज प्लास्टिकचा कचरा बायोडीग्रेडिबल म्हणजे कंपोस्ट होऊ शकत नाही. सिंगल युज प्लास्टिक जाळूनही नष्ट होत नाही. तो मायक्रो कणांच्या माध्यमातून आस्तित्वात राहतो. सिंगल युज प्लास्टिक जाळण्याचा प्रयत्न केला तर वायू प्रदूषण होते. हा कचरा जमिनीखाली दबला तर पाण्याच्या स्त्रोतांना अडथळा निर्माण करतो. हे सिंगल युज पलिस्टक नदी, विहीर, तलावात टाकले तर जलस्त्रोत खराब होतात. नदीतून वाहून सिंगल युज प्लास्टिक समुद्रात जाऊन साठते. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलचारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकचे कण जलचरांच्या पोटात जात असल्याने त्यांचे आस्तीत्वाच धोक्यात आले आहे. सिंगल युज प्लास्टिक नष्ट होत नाही. पाण्यात, जमिनीत मायक्रो कण वर्षानुवर्ष राहतात. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलप्रदूषणही होते. सिंगल युज प्लास्टिक कचरा कुंडीत टाकला जातो. हा कचरा गुरांकडून खाल्ला जातो. त्यामुळे गुरांना आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होतात. एकूणच सिंगल युज प्लास्टिक मुळे जल, वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

मनुष्यप्राण्यांसह इतर जैवविविधतेला सिंगल युज प्लास्टिकमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिक मानवी



आरोग्यासाठी तसेच जैवविविधतेसाठी हानिकारक असल्याने त्याचा वापरावर सरकारकडून टप्पा टप्प्याने निर्बंध लादले जात आहेत.

निर्बंधासोबतच सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम नागरिकांपर्यंत पोहचिण्यासाठी सरकारने जनजागृती करायला हवी. सरकारने सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगायला हवेत. शाळा कॉलेजमधून देखील याबाबत प्रबोधन करायला हवे. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन कारणे आणि सिंगल युज प्लास्टिक वस्तूंचा वापर कमी करणे या दोन्ही विषयी जाणीव जागृती होणे, हे अत्यंत महत्वाचे आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे संपूर्ण सजीव सृष्टीलाच धोका निर्माण झाल्याने नागरिकांनीच सिंगल युज प्लास्टिक पासून दूर राहायला हवे. सरकारने सिंगल युज प्लास्टिकवर निर्बंध लादले जात असेल तरी त्याचा वापर कमी होताना दिसत नाही. त्यामुळे या प्लास्टिकचे दुष्परिणाम जाणून घेत नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करणे हाच भविष्यात मानवजीवन व जैव विविधता राखण्याचा मार्ग आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## कु.रागिणी चौदंते ची राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत निवड



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२८, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल ची विद्यार्थिनी कु.रागिणी राजरत्न चौदंते हीने शालेय स्तरावरील कराटे स्पर्धेत लातूर विभागात प्रथम आली, तसेच विभागीय कराटे स्पर्धेत ३८ ते ४२ वजन गटात प्रथम क्रमांक पटकविला आहे.

त्यामुळे धुळे येथे होणाऱ्या शालेय स्तरावरील राज्य पातळीवरील कराटे स्पर्धेत कु. रागिणी चौदंते हया विद्यार्थ्यांनीची निवड झाली आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे, क्रीडाशिक्षक माधव गाडेगावकर, ज्ञानेश्वर बायेस, टि बि पवार, डी जी धनगरे, जी बी गुजरवाड, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता लाटकर, शिक्षिका हेमलता व्यास, यांसह आई, वडिल, व चौदंते परिवारासह आदिंनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या.

### जागा..

ई व्हीएम बाबावर
आग पाखड त्रागा
पुन्हा एकदा भारी
समोरा जाई रागा

लागला न निकाल
मुळीचं मना जोगा
पछाडले त्रस्तग्रस्त
का संशयाच्यारोगा

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

चित्रविचीत्र निर्णय
लावतो कसले टगा
सारे कसे ऑलवेल
इतर राज्यात बघा

जिंकलो जेंव्हा मागे
उरली दोनबोटेस्वर्गा
उत्साहे केला कल्ला
करारा कापला मुर्गा

जंगजंग रे पछाडले
न मिळे पुरावे धागा
खोट्या रुप सत्याचे
धडाडा तोफा डागा

प्रक्रियाहवी निःशंक
शंकेला नको जागा
फेडून टाका संभ्रमा
अरे आतातरी जागा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## हिंदूंच्या मताधिक्यावर स्थापन होणाऱ्या नव्या सरकारने हिंदूंचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत !

लोकसभेतील अपयशानंतरही महाराष्ट्रात महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले आहे. या भरघोस यशाचे गमक शोधताना अनेक जण हे यश म्हणजे लाडक्या बहिणींनी आपल्या लाडक्या भावांना दिलेली भेट असल्याचे सांगत आहेत तर काहींच्या मते राज्यातील हिंदू जागृत झाल्यानेच त्याने महायुतीला भरभरून मतदान केले आहे, महायुतीचे काही नेते ही महायुतीने केलेल्या विकासकामांची पोचपावती असल्याचे सांगत आहेत, तर विरोधक हा निकाल अनपेक्षित आणि अविश्वसनीय असल्याचे सांगत महायुतीच्या या यशामागे ईव्हीएम मशीनमध्ये करण्यात आलेला घोळ कारणीभूत आहे असे सांगतानाच निवडणूक बॅलेट पेपरवर घेण्याची मागणीही करत आहेत, असे असले तरी या निवडणुकीतील पराजय महाविकास आघाडीने स्वीकारला आहे. थोड्याच दिवसांत राज्यात स्थिर सरकार स्थापन होईल. याआधी अडीच वर्षे सत्ता उपभोगणाऱ्या महायुतीला यापुढील काळ मात्र मोठ्या जबाबदाऱ्या आणि जनतेच्या अपेक्षा यांच्या पूर्तीसाठी पार पाडावा लागणार आहे. जनतेला दिलेली आश्वासने पाळणे, आपले सरकार हिंदुत्ववादी असल्याचे सिद्ध करणे आणि त्यासोबतच राज्यात आलेले उद्योग परराज्यात कसे जाणार नाहीत ही काळजी घेणे त्यांना क्रमप्राप्त आहे.

नेहमीच्या निवडणुकीपेक्षा यंदाची निवडणूक ही विविध घोषणांनी गाजली. 'बटेंगे तो कटेंगे', 'एक है तो सेफ है', 'जो हिंदूहित की बात करेगा वही देशपर राज करेगा' यांसारख्या घोषणा चर्चेच्या विषय ठरल्या होत्या तर दुसऱ्या बाजूने एका गटाकडून झालेल्या 'व्होट जिहाद'च्या आवाहनालाही कडाडून विरोध केला जात होता. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात राजकीय पक्षांव्यतिरिक्त हिंदुत्ववादी आणि धार्मिक संघटना, संप्रदाय, स्वयंसेवी संस्था, राज्यातील संत महंत हे सुद्धा महायुतीच्या प्रचारार्थ मैदानात उतरले होते. हिंदुत्वाच्या रक्षणासाठी हिंदूंनी मतदान करण्यासाठी बाहेर पडावे यासाठी सामाजिक माध्यमांतून जोरदार प्रसार सुरु होता. या निवडणुकीला जणू धर्मयुद्धाचे स्वरूप देण्यात आले होते, अर्थात याचा महायुतीला मोठ्या प्रमाणात लाभ झाला. गत निवडणुकीच्या तुलनेत राज्यातील मतदानाची टक्केवारी ५ ते ६ टक्यांनी वाढली. 'वाढलेल्या टक्केवारीचा फायदा भाजपला होतो' असे खुद्द देवेंद्र फडणवीससुद्धा म्हणाले. त्यामुळे हिंदुत्ववादी जनतेने स्वयंस्फूर्तीने केलेला प्रचार महायुतीला पुन्हा एकदा सत्तास्थानी बसवण्यास कारणीभूत ठरला असे म्हणण्यास हरकत नाही. अर्थात महायुतीच्या नेतेमंडळींनीही हे मान्य करून संत महंतांचे, हिंदुत्ववादी संघटनांचे आणि नेत्यांचे आभार मानले. अर्थात केवळ आभार पुरेसे नसून हिंदुत्ववाद्यांची साथ अखंड सोबत हवी असेल, तर येणाऱ्या काळात सरकारला हिंदुहिताची कामेही करावी लागतील. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा अस्तित्वात आहे, शिवाय राज्यात गोमातेला राज्यमातेचा दर्जा देण्यात आला आहे; तरीही गोहत्या थांबलेल्या नाहीत.

गोशाळांना पुरेसे अनुदान न मिळाल्यामुळे गाईंच्या चारा पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे, उन्हाळ्याच्या काळात हा प्रश्न अधिकच भेडसावतो. भाकड गाईंचे करायचे काय हा शेतकऱ्यांसमोर नेहमीच प्रश्न उभा राहतो, त्यासाठी सरकारने पावले उचलायला हवीत. गाईंचे संरक्षण आणि संवर्धन हे दोन्ही प्रश्न नवीन सरकारने सोडवावेत ही सामान्य हिंदूंची अपेक्षा आहे. 'लव्ह जिहाद' नावाचे षडयंत्र देशभर छुप्या पद्धतीने चालू आहे आणि त्याला आजतागायत लाखो हिंदू मुली बळी पडल्या आहेत. हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे धर्मांतर करून त्यांच्याशी निकाह केला जातो. त्यांच्या माध्यमातून मुले जन्माला घातली जातात आणि त्यानंतर त्यांना वाऱ्यावर सोडले जाते, त्यांचा छळ केला जातो तर काहींची आखाती देशांत विक्री केली जाते. अतिरेकी कारवायांसाठी त्यांचा वापर केला जातो. हे सारे काही सुनियोजित षडयंत्र असल्याचे पुराव्यानिशी सिद्ध झाले वेळोवेळी न्यायालयानेही हे मान्य केले आहे. लव्ह जिहादची भयावहता दर्शवणारा 'दि केरला स्टोरी' नावाचा चित्रपटही देशभर गाजला. लव्ह जिव्हाद म्हणजे हिंदूंचा वंशविच्छेद आहे. लव्ह जिहादची भीषणता ओळखून ज्याप्रमाणे उत्तर प्रदेश सरकारने राज्यात त्याविरोधात कायदा पारित केला त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही हा कायदा करून त्याची कठोरपणे अमलबजावणी करावी हीसुद्धा हिंदूंची एक मागणी आहे. वक्फ बोर्ड कायद्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकार आग्रही आहे, त्यासाठी राज्य सरकारनेसुद्धा सहकार्य करावे. वक्फ बोर्डाने गिळंकृत केलेल्या राज्यातील हिंदूंच्या जमिनी हिंदूंना परत कराव्यात यासाठीही हिंदुत्ववादी आग्रही आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या आणि गैरसरकारी संघटनांकडून चालवण्यात येणाऱ्या 'हलाल इकॉनॉमी'वर पायबंद घालून राज्यात हलाल सर्टिफिकेशनवर बंदी आणण्यात यावी अशीही मागणी हिंदूंकडून करण्यात येत आहे, उत्तर प्रदेशसह अनेक राज्यांनी यावर आधीच बंदी घातली आहे.

महाराष्ट्र सरकारनेही यावर बंदी घालावी याबातची मागणी गेल्या काही वर्षांपासून केली जात आहे त्यावर नव्या सरकारने तातडीने निर्णय घ्यायला हवा. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले पुरातन दुर्ग, किल्ले हे जसे महाराष्ट्राचे वैभव आहे तसे ते पराक्रमी मावळ्यांच्या पराक्रमाचे आणि बलिदानाचे साक्षिदार आहेत. हा ऐतिहासिक ठेवा जतन करून त्याचे संवर्धन करणे हे राज्य सरकारचे कर्तव्यच आहे; मात्र गेल्या काही वर्षांत यातील अनेक गड किल्यांवर अवैध वस्त्या, मांस मटणाची दुकाने, मजारी निर्माण झाल्या आहेत, त्यावर वेळीच कारवाई नाही केली तर येणाऱ्या काळात हा ऐतिहासिक ठेवाच नष्ट होऊन जाईल, याकरिता सरकारने या गड किल्यांची युद्ध पातळीवर पाहणी करून त्यावरील अवैध वस्त्या आणि अनधिकृत बांधकामे पाडावीत यासाठीही गेली काही वर्षे हिंदुत्ववादी संघटना सरकारकडे निवेदने देत आहेत, पाठपुरावा करत आहेत. सरकारने हाही प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावायला हवा. याशिवाय राज्यातील पुरातन मंदिरांचा जीर्णोद्धार, मंदिरांची सरकारीकरणातून मुक्तता, सर्व मंदिरांत वस्त्रसंहिता लागू करावी यांसारखे अनेक प्रश्न आणि मागण्या घेऊन गेली काही वर्षे हिंदुत्ववादी संघटना आणि संत महंत सरकारकडे पाठपुरावा करत आहेत. हिंदूंच्या मतांवर निवडून आलेल्या महायुतीने आतातरी या प्रश्नांचा प्राधान्याने विचार करून हे प्रश्न पुढील काही दिवसांत सोडवावेत ही सामान्य हिंदूंची अपेक्षा आहे !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## कल्याणराव आखाडे यांना विधान परिषदेची संधी द्यावी : डॉ. राजीव काळे


**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२८, सुपा (अहिल्यानगर) :** सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत स्टार प्रचारक म्हणुन महायुतीच्या बाजुने अत्यंत निष्ठेने भूमिका निभावली.

राज्यात झालेल्या विधानसभेच्या निकालामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढविण्यामध्ये सावता परिषदेची मोलाची मदत झालेली आहे. कल्याणराव आखाडे या नेतृत्वाला न्याय म्हणुन त्यांना विधान परिषद सदस्य म्हणुन संधी द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्याकडे सावता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ.राजीव काळे यांनी केली आहे.

कल्याणराव आखाडे यांचा दांडगा जनसंपर्क व क्रीयाशील व्यक्तिमत्त्व म्हणुन त्यांचा परिचय सावता परिषदेने महाराष्ट्राला दिलेला आहे.अमोघ वक्तृत्वाने त्यांनी समाजात जागर केला. सावता परिषदेच्या माध्यमातून राज्यातील माळी समाज जोडलेला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.पक्षवाढीसाठी त्यांनी घेतलेली मेहनत सर्वांना ज्ञात आहे.नुक्ताच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत त्यांची भूमिका निर्णायक राहिली. राज्यात सावता परिषदेला मानणारा माळी समाजाची मते महायुतीच्या पारड्यात मिळाली. अनेक मतदार संघात सावता परिषदेचा निर्णायक



प्रभाव आहे.कल्याणराव आखाडे यांनी अनेक मतदारसंघात प्रचार सभा घेतल्या. घेतलेल्या प्रचार सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भरभरून यश मिळालेले आहे. एक निष्ठावंत,प्रमाणिक व क्रीयाशील नव्या चेह-याला विधीमंडळाच्या विधान परिषदेची संधी मिळावी ही माळी समाजासह अनेकांची अपेक्षा आहे. अजितदादा कल्याणराव आखाडे या नेतृत्वाला न्याय देतील असा विश्वास सावता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना आहे. विधानपरिषद सदस्य म्हणून या निवडणुकीत अनेकजण विधान सभा निवडणुकीत विजयी झालेले आहेत. यामध्ये पाथरी विधानसभेत राजेश विटेकर यांचा विजय झालेला आहे. त्यांच्या होणा-या विधान परिषदेच्या रिक्त जागी कल्याणराव आखाडे यांना संधी द्यावी. विधानपरिषदेची संधी देऊन आगामी काळात काम करण्यास बळ मिळेल अशी अपेक्षा अजितदादा पवार यांच्याकडे सावता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ.राजीव काळे व अहिल्यानगर दक्षिणचे जिल्हाध्यक्ष सुदाम मामा लोंढे. उपाध्यक्ष रोहित मेमाणे यांनी व्यक्त केली आहे.


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# राष्ट्रपती यांच्या आयुर्वेद निसर्ग चाचणीने प्रकृती परिक्षण अभियानाला सुरुवात

## केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांनी केले राष्ट्रपतींचे स्वागत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, बुलडाणा :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या आयुर्वेद निसर्ग चाचणीने प्रकृती परीक्षण अभियानाला देशभरात सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव उपस्थित होते. हा आयुर्वेद निसर्ग चाचणी अभियान पुढील एक महिना संपूर्ण देशात चालणार आहे. देशामध्ये आयुर्वेदाचा प्रचार-प्रसार होण्याच्या दृष्टीकोनातून 'हर घर आयुर्वेद निसर्ग चाचणी (प्रकृती परिक्षण) अभियान' देशात राबविण्याचा संकल्प केंद्रीय आयुष (स्वतंत्र कार्यभार) आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी हाती घेतला आहे.



भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून हे अभियान संपूर्ण देशात राबविल्या जाणार आहे. या अभियानाची सुरुवात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या आयुर्वेद निसर्ग चाचणीने करण्यात आली.

'हर घर आयुर्वेद' हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संकल्प या अभियानातून साकारल्या जाणार आहे. हे अभियान २६ नोव्हेंबर पासून संपूर्ण देशात सुरू झाले असून पुढील एक महिना हे अभियान देशात राबविल्या जाणार आहे. या अभियानाची सांगता २५ डिसेंबरला माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जयंती दिनी होणार आहे. या अभियानामध्ये ४ लाख पेक्षा जास्त आयुर्वेदचे शिक्षण घेणारे विद्यार्थी डॉक्टर्स सहभागी होणार आहेत.

या अभियानाच्या माध्यमातून एका महिन्यामध्ये एक कोटी नागरिकांची आयुर्वेद निसर्ग चाचणी (प्रकृती परिक्षण) करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. हे परिक्षण करताना आधुनिक तंत्रज्ञानाचाही उपयोग घेण्यात आला आहे.

या अभियानामध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींना त्यांच्या आयुर्वेद चाचणी अहवालानुसार मोबाईलवर आरोग्य संदर्भातील माहिती देण्यात येणार आहे. देशातील हा अभिनव प्रयोग आयुर्वेद निसर्ग उपचारासाठी नवीन दालन उपलब्ध करून देणारा ठरणार आहे, अशी अपेक्षा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी या अभियानाच्या उद्घाटना प्रसंगी व्यक्त केली आहे.

# संविधानाची नितीमुल्ये दैनंदिन जीवनात आत्मसात केली पाहिजे - मुख्य कार्यकारी अधिकारी

## जिल्हा परिषदेत संविधान दिन उत्साहात साजरा...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, बुलडाणा :** जिल्हा परिषद बुलडाणा येथे दि. २६ नोव्हेंबर ते २६ जानेवारी २०२५ पर्यंत साजरा करण्यात येणाऱ्या घर घर संविधान अभियानांतर्गत संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात हे होते. यावेळी भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

अध्यक्ष गुलाब खरात मनोगत व्यक्त करताना म्हणाले, संविधानाची नितीमुल्ये ही फक्त पुस्तकात न ठेवता दैनंदिन जीवनात ही तत्वे आत्मसात केली पाहिजे. संविधानाचा जागर व संविधान अमृत महोत्सव हा दरदिवशी साजरा करण्याचे त्यांनी आवाहन केले. श्री खरात यांच्या संकल्पनेतून संविधान दिनानिमित्त संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली. प्रश्नांची अचुक उत्तरे देणाऱ्या कर्मचाऱ्यास भारतीय संविधानाची प्रत भेट स्वरुपात देण्यात आली. यात आकाश नवघरे, आरती गवाई, प्रतिक्षा दळे, अजित चव्हाण हे कर्मचारी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे विजेते ठरले.

या कार्यक्रमाला अति.मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम. मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशिष पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड, कार्यकारी अभियंता राहुल जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी अमोल गीते, उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय इंगळे, शिक्षणाधिकारी वैशाली ठग, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी तृप्ती खेडेकर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विशाल वानखेडे व आभार प्रदर्शन उमेश जैन यांनी केले. यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथ.) बाळासाहेब खरात, सतीष गायकवाड, विशाल वानखेडे, हेमा पाचपोळे यांनी मनोगत व्यक्त केले.

# अजितदादांच्या मुख्यमंत्री पदासाठी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचे तुळजाभवानी देवीचरणी साकडे

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२८, धाराशिव :** महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदी अजितदादा पवार विराजमान व्हावेत यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी तुळजापूर येथे गुरुवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ रोजी कुलस्वामीनी तुळजाभवानी देवीची महापूजा करून साकडे घातले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अजिदादा पवार व्हावेत. अशी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तमाम कार्यकर्त्यांची इच्छा आहे.

यावेळेच्या विधानसभा निवडणुकीत देखील अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली मोठे यश मिळविले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. म्हणून अजितदादा पवार हेच मुख्यमंत्री व्हावेत याकरीता कार्यकर्त्यांनी तुळजापूर येथे तुळजाभवानीचे महंत वाकोजी बुवा यांच्या उपस्थितीत कुलस्वामीनी आई तुळजाभवानी देवीची खणानारळाने ओटी भरून महापूजा केली.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते अजितदादा समर्थक तथा अजितदादा विचार प्रसारक मंडळ धाराशिवचे संस्थापक अध्यक्ष नंदकुमार गवारे म्हणाले की, महाराष्ट्राचे धाडसी, कर्तव्यदक्ष आणि अनुभवी नेतृत्व अजितदादा पवार मुख्यमंत्री व्हावेत म्हणून आज देविचरणी साकडे घातले आहे. महाराष्ट्र राज्याला देशात नंबर वन आणि सर्वात पुढे न्यायचे असेल तर सर्वसामान्य जनता आणि कार्यकर्त्यांची जाण असणारे अजितदादा मुख्यमंत्री होणे ही काळाची गरज आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी नंदकुमार गवारे यांच्यासम वेत राष्ट्रवादी काँग्रेसचे तुळजापूर शहराध्यक्ष महेश चोपदार, सदस्य दत्तात्रय हुंडेकरी व इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुबलक पाणीपुरवठा, योग्य वातावरणाचा शेतकऱ्यांना रब्बीमध्ये फायदा व्हावा - जिल्हाधिकाऱ्यांचा थेट बांधावर दौरा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, नांदेड :** यावर्षी झालेला मुबलक पाऊस, जलसाठ्यांमधील विपूल प्रमाणातील सिंचनाचे पाणी व पाऊसासोबतच योग्य प्रमाणातील थंडीचे वातावरण यामुळे रब्बीसाठी आवश्यक असणारे नैसर्गिक वातावरण आहे. त्यामुळे हा रब्बी चा हंगाम शेतकऱ्यांना चांगला जाईल यासाठी सर्व पूरक उपाययोजना करा, असे आवाहन



जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे. जिल्ह्यातील विविध गावांचा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दौरा करून रब्बी हंगामाच्या पीक परिस्थितीची पाहणी गेली दोन दिवस केली.

यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना उत्तम पूरक उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी एलेचपूर येथील प्रशांत दुर्गादास तीर्थे यांच्या शेतावर दौऱ्या दरम्यान भेट दिली. यावेळी त्यांनी हरभरा, ज्वारी व हळद पिकांची पाहणी केली. हरभरा पिकांमध्ये जास्तीत जास्त जैविक कीड नियंत्रण करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी तालुका कृषि अधिकारी संजय चातरमल, मंडळ कृषि अधिकारी सुनिल सानप, कृषि पर्यवेक्षक चिंचूवाड, कृषि सहायक श्रीमती शिंदे उपस्थित होत्या. नांदेड तालुक्यामध्ये यावेळी हरभरा, ज्वारी व गहू पिकाखाली शेकडो हेक्टर जमीन आहे. त्यामुळे व्यवस्थापनाच्या सूचना वरचेवर करण्याचे त्यांनी सांगितले.

# प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाईत १ लाख ६० हजार दंड; ६२ किलो प्लास्टिक जप्त

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, नवी मुंबई :** 'प्लास्टिकमुक्त नवी मुंबई' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी नागरिकांपर्यंत पोहचून एकल वापर प्लास्टिकचा वापर टाळावा यासाठी व्यापक जनजागृती करण्यात येत असून दुसऱ्या बाजुला प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाई करुन प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात येत आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार दिवाळीच्या आधीपासूनच प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाईला सुरवात करण्यात आली असून नोव्हेंबर महिन्यात २५ दुकाने / आस्थापना यांच्यावर कारवाई करीत १ लाख ६० हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ६२ किलो १०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आलेले आहे.

यामध्ये बेलापूर विभागात १८ दुकाने/ आस्थापना यांच्यावर कारवाई करत १ लाख २५ हजार दंडात्मक रक्कम वसूल केली आहे. तसेच ४२ किलो एकल वापर प्लास्टिक जप्त केले आहे. अशाचप्रकारे नेरुळमध्ये एका दुकानावर कारवाई करत ५ हजार दंडात्मक रक्कम वसूली व १.५ किलो एकल वापर प्लास्टिक जप्त केले आहे. वाशी विभागातही १ दुकानदाराकडून १ किलो एकल वापर प्लास्टिक जप्ती तसेच ५ हजार दंडात्मक रक्कम वसूली करण्यात आली आहे. कोपरखैरणे विभागातही १ दुकानदाराकडून ५०० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्ती तसेच ५ हजार दंड वसूली करण्यात आली आहे.

याशिवाय परिमंडळ १ मधील भरारी पथकाने १५ किलो प्लास्टिक जप्ती व ५ हजार दंड वसूली आणि परिमंडळ २ मधील भरारी पथकाने ३ दुकानदारांवर कारवाई करुन २ किलो १०० ग्रॅम प्लास्टिक साठा जप्ती तसेच १५ हजार दंडात्मक रक्कम वसूल केली आहे. अशाप्रकारे नोव्हेंबर महिन्यात नमुंमपा क्षेत्रात १ लाख ६० हजार दंडात्मक रक्कम वसूली व ६२ किलो १०० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक साहित्य जप्त करण्यात आले आहे. प्लास्टिकमुळे निसर्गाला व मानवी जीवनाला होणारी हानी लक्षात घेऊन नागरिकांनी प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिकला दैनंदिन वापरातून पूर्णपणे हद्दपार करावे व स्वच्छ सुंदर पर्यावरणशील शहर हा नवी मुंबईचा नावलौकिक वृध्दींगत करत रहावा असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# थोडक्यात


## माथेरान वण विभागाकडून जंगल आग प्रतिबंध उपाययोजना सुरू

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**



**दि.२८, माथेरान :** माथेरान वन विभागातर्फे माथेरान डोंगर परिसरात जाळ रेषा, आग प्रतिबंधक योजना राबविण्यास सुरुवात झाली आहे. मागे दोन-चार दिवसांपासून जंगल वाचविले जंगल सुरक्षित राहणे. यासाठी दरवर्षी पावसाळ्यानंतर वन विभागातर्फे आग प्रतिबंधक जाळ रेषा उपाय उपक्रम राबविला जातो. पावसाळ्यामध्ये सर्व ठिकाणी हिरवेगार गवत वाढलेली असते. पाऊस संपल्यानंतर साधारण ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये हे गवत सुकण्यास सुरुवात होते. त्यामुळे काही ठिकाणी जंगलाला वणवा लागतो आग लागली जाते. त्यामुळे जंगलाबरोबर वन्यजीवांचे प्रचंड नुकसान होते. पुढील अनर्थ टाळण्यासाठी वन विभागाकडून आग प्रतिबंधक उपाय केला जातो. यामध्ये डोंगराच्या मध्यभागी गवत फेटून दिले जाते. साधारण १५ मीटर चा भागात आग लावली जाते आणि ती विजवली जाते. त्यामुळे दोन्ही बाजूच्या जंगलामध्ये अंतर राहिल्याने आग लागली तरी त्याचा फार मोठा नुकसान होणार नाही. यासाठी जाळ रेषा हा उपाय राबविला जातो. माथेरान डोंगर भागात हा उपाय पुढील १० दिवस सकाळ संध्याकाळ राबविला जाणार आहे. अशी माहिती माथेरान वन विभागातर्फे परिमंडळ वन अधिकारी आर.जे.आडे यांनी दिली. तर या उपक्रमात संपूर्ण वण कर्मचारी वर्ग सहभागी होते.

## आ.राठोड यांना उपमुख्यमंत्री पद मिळावे; बंजारा समाजाची मागणी



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.२८, किनवट (नांदेड) :** दिग्रस-दारव्हा-नेर मतदारसंघाचे आमदार संजय भाऊ राठोड हे २००४ ते २०२४ पर्यंत दिग्रस-दारव्हा-नेर मतदारसंघातून सलग पाच वेळा आमदार म्हणून निवडून येणारे बंजारा समाजाचे एकमेव आमदार आहेत. त्यामुळे त्यांना उपमुख्यमंत्री पद मिळावे. अशी मागणी बंजारा समाजाच्या वतीने वासुदेव राठोड यांनी केली आहे. सन २००४ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी आ.संजय राठोड यांच्या वर विश्वास दाखविला आणि तात्कालीन गृहमंत्री माजी.आ.माणिकराव ठाकरे यांचा तब्बल २२ हजार मतांनी पराभव करत विजय मिळवला होता. आ.संजय राठोड हे २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारणाच्या जोरावरच सलग पाच वेळा आमदार झाले आहेत. २००९ साली खा.संजय देशमुख यांना तब्बल ५० हजार मतांनी पराभव केले आणि सर्वाधिक मतांनी येणारे बंजारा समाजाचे एकमेव आमदार ठरले तर नुकत्याच झालेल्या २०२४ विधानसभा निवडणुकीत मा.आ.माणिकराव ठाकरे यांना ५१ हजार मतांनी पराभव केले आहे. त्यामुळे आ.संजय राठोड यांना उपमुख्यमंत्री पद मिळावे. अशी मागणी महाराष्ट्र राज्यातील तमाम बंजारा समाजाच्या वतीने वासुदेव राठोड यांनी केली आहे.

## एनव्हीपी शुगरच्या प्रथम गळीत हंगामात गाळपास आलेल्या ऊसाचे २५०० रुपये शेतकर्यांच्या खात्यात जमा

**अक्षराज: संगीता वनकळस**

**दि.२८, धाराशिव :** धाराशिव तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा.लि. या कारखान्याच्या प्रथम गळीत हंगामात पहिल्या पंधरवाड्यात गाळपासाठी आलेल्या ऊसाचे २ हजार ५०० रुपये प्रमाणे संबंधित शेतकर्यांच्या खात्यात जमा करण्यात आले. असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन नानासाहेब व्यंकटराव पाटील यांनी दिली. संबंधित शेतकर्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या शाखेत तसेच ज्या शेतकऱ्यांचे खाते उस्मानाबाद जनता सहकारी बँकेत आहे त्या शेतकऱ्यांनी संबंधी बँकेत जाऊन बिल घ्यावे. तसेच ज्या शेतकर्यांनी अद्याप शाखेत खाते उघडलेले नाही त्यांनी खात्याची नोंद करावी, असे आवाहन ही चेअरमन नानासाहेब पाटील यांनी केले आहे. धाराशिव तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकर्यांची अडचण लक्षात घेऊन गतवर्षी जागजी शिवारात नानासाहेब व्यंकटराव पाटील यांनी एनव्हीपी शुगर प्रा.लि. या कारखान्याची उभारणी केली. चाचणी गळीत हंगामात ऊस उत्पादक शेतकर्यांना सर्वाधिक दर दिल्यामुळे शेतकर्यांनी मोठ्या प्रमाणात ऊस प्रथम गळीत हंगामात कारखान्याला दिला आहे. चाचणी गळीत हंगामात सर्वाधिक दर देण्याची घोषणा चेअरमन पाटील यांनी केली होती. त्या वचनाला जागत जागजीच्या एनव्हीपी शुगरने गाळपास आलेल्या ऊसाचे बिल १५ दिवसांत संबंधित शेतकर्याच्या खात्यात जमा करण्याची परंपरा प्रथम गळीत हंगामातही जोपासली आहे. त्यानुसार ४ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत गाळपास आलेल्या ऊसाचे २ हजार ५०० रुपये प्रमाणे बिल संबंधित ऊस उत्पादक शेतकर्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. चाचणी गळीत हंगामाप्रेक्षा जास्त प्रतिसाद प्रथम गळीत हंगामात मिळाल्यामुळे यंदा सर्वाधिक ऊस गाळप होईल असा विश्वासही चेअरमन नानासाहेब व्यंकटराव पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## मुदखेड येथे ज्ञानेश्वर माऊली समाधी सोहळा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२८, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरात श्री विठ्ठलेश्वर मंदिर येथे ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळा व सदुरु संतकवी श्री दासगणू महाराज यांच्या स्मरण दिनानिमित्त हरिभक्त पारायण भास्कर महाराज कामारीकर यांचे कीर्तन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कीर्तनकार भास्कर महाराज कामारीकर यांनी दासगणू महाराज यांच्या चरित्रातील परोपकारी संत पृथ्वीवर जे अवतार घेतात त्यामध्ये श्री ज्ञानेश्वर माऊली व दासगणू महाराज हे संत आपल्याला मार्गदर्शनासाठी वैकुंठा होऊन आले. अशा सद्गुरु पुरुषांची पुण्यतिथी मुदखेड शहरात विठ्ठल मंदिरात मोठ्या भक्तिभावाने साजरी केली जाते ही परंपरा कायम आहे.

या पुण्यतिथीनिमित्त मागील ९ दिवसापासून येथील विठ्ठल मंदिरात ज्ञानेश्वरी पारायण नंदकुमार मामीडवार यांनी वाचन केलं या पारायण सोहळ्यात येथील असंख्य महिला भगिनींनी सहभाग घेतला. दि.२८ नोव्हेंबर रोजी पुण्यतिथी व पारायण सोहळा तसेच काल्याचे किर्तन संपल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.